**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.०२/०३/२०१९**

**दि.०१/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ८८/१९,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | रंजित फुलसुंदर, वय-२४ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | एक बुलेट मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०२/२०१९ रोजी रात्रौ ००/१५ वा.सुमारास एन.डी.ए. रोडवर सावीत्री निवास समोर वारजे, पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कामावरुन घरी जाण्यासाठी चालत जात असता एन.डी.ए. रोडवर सावीत्री निवास समोर वारजे पुणे येथे आले असता, त्यांचे मागुन एक पांढ-या रंगाची बुलेट वरील तीन अनोळखी इसम यांनी फिर्यादी यांना फोन लावण्यास सांगुन, फिर्यादी यांचे हातातील मोबाईल हॅंडसेट एकूण ९,०००/- रु.किं.चा. ऐवज हिसकावुन घेवुन, हाताने व लाथा-बुक्क्याने मारहान करुन,आंबेडकर चौकाच्या दिशेने दुचाकीवरुन पळुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. क्षिरसागर ९७३०८८८८३९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगडरोड पो स्टे २०१/१९,भादविक ४२०,४१९,३४,माहिती तंत्रज्ञान अधि.क. ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम, वय ३६ वर्षे,रा.सिंहगडरोड,पुणे |
| **आरोपी** | मोबाईल धारक व खाते धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जुन २०१८ पासुन ते आजपर्यंत फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | वर नमुद केले कालावधीमध्ये यातील अनोळखी मोबाईल धारकांनी फिर्यादी यांन फोन करुन, त्यांना कॅनडा येथील डफरीन कन्स्ट्रक्शन कंपनीत नोकरी लावुन देण्याच्या बहाण्याने फिर्यादी यांचेकडुन पासपोर्ट, व्हीजा, विमानाची तिकीटे व इतर कामासाठी म्हणुन एकुण १ लाख रुपये त्यांनी दिलेल्या विविध बॅंकेच्या खात्यावर भरण्यास सांगुन, फिर्यादी यांना नोकरी न लावता व पैसे परत न देता, फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. डी.बी.पवार ९८२२८३०६६८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ४२/१९,भादविक १४३,१४७,१४८,१४९,४२७,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | संगिता खराडे, वय ४२ वर्षे,रा.मेहंदळे गॅरेज,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | ८ ते १० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०२/२०१९ रोजी रात्री २१/१५ वा. चे सुमारास २१७/१/अ, गणेशनगर, मेहंदळे गॅरेज समोर, गुळवणी महाराज रोड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी,फिर्यादी यांचे गल्लीमधील ८ ते १० इसमांनी आपआपसात संगनमत करुन, बेकायदेशीर जमाव जमवुन,हातात कोयत्यासारखे धारधार शस्त्र घेऊन , फिर्यादी यांचे घराचे दरवाज्याचे, खिडकीचे नुकसान करुन, तसेच नेहा फाले यांचे अंगावर धाऊन जाऊन त्यांचा मोबाईल फोडुन शिवीगाळ करुन,त्यांच्या ॲक्टीवा गाडीचे व फिर्यादी यांचे भाडेकरुचे व शेजारी राहणारे खामकर यांचे गाडीचे तोडफोड करुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.जी.शिनगारे ९८३४८२१८७६ |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे

२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील

३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.

४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.

५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.

६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.

७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६







जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर